# News Line

## अमली पदार्थ विरोधी दिनी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती



**पुणे** : पंख संस्था, क्विकहिल फाउंडेशन आणि खडक पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अमली पदार्थ विरोधी दिन साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम शिवाजी मराठा महाविद्यालयात इयत्ता १२ वीच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता. यामध्ये पोलीस निरीक्षक उत्तम चक्रे यांनी विद्यार्थ्यांना वयात येतानाचे धोके आणि व्यसने या विषयावर उत्तम मार्गदर्शन केले; तसेच पंख संस्था अध्यक्ष स्मिता आपटे यांनीही मुलांना याविषयावर माहितीपर मार्गदर्शन केले. याचबरोबर व्यसनाधीनता, त्याचे प्रकार व त्यातील धोके यावर पंख संस्थेचे समुपदेशक कौस्तुभ जोगळेकर यांनी मुलांना माहिती दिली. यावेळी क्विकहिल फाउंडेशनचे सी.एस.आर प्रमुख अजय शिर्के शाळेच्या मुख्याध्यापिका, उपमुख्याध्यापिका, पोलीस कर्मचारी व शिक्षक उपस्थित होते.